नवराष्ट्र
www.navarashtra.com

# भंडाऱ्यात विद्यार्थ्यांना दिले सायबर सुरक्षेचे धडे

## क्विक हिल फाउंडेशन, पटेल महाविद्यालयाचा उपक्रम



**भंडारा,** ब्युरो. क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत सातोना येथील मॉडर्न हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात जे. एम. पटेल कॉलेज, भंडारा येथील संगणकशास्त्र विभागाचे विद्यार्थी उत्कर्ष गणवीर आणि विजय लांजेवार यांनी मार्गदर्शन केले. सायबर वॉरिअर म्हणून काम पाहणाऱ्या या विद्यार्थ्यांनी इंटरनेट वापरातील खबरदारी, मोबाईलचा सुरक्षित वापर, ऑनलाईन फसवणूक टाळण्याचे उपाय यांसह स्वतःचे आणि कुटुंबाचे संरक्षण कसे करावे याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी उदाहरणांसह विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले.

मुख्याध्यापक एम. सी. भावनकुळे यांनी विद्यार्थ्यांना क्विक हिल फाउंडेशनमुळे उत्कृष्ट व्यासपीठ लाभले असल्याचे सांगितले. त्यांनी फाउंडेशनच्या अनुपमा काटकर आणि अजय शिर्के यांचे विशेष आभार मानले. या कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख, सहकारी प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले होते.

Bhandara Plus Edition
Sep 20, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com